आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र दुपारी ३.०० वाजता

२२ मार्च २०२४ - शुक्रवार

इस्त्रो अर्थात भारतीय अंतराळ संशोधन संस्थेनं आज सकाळी कर्नाटक मधल्या चित्रदुर्ग चाचणी केंद्रावर पुनर्वापर करण्याजोग्या ‘आर. एल. व्ही. पुष्पक’ या उपग्रह प्रक्षेपक वाहनाचं यशस्वीपणे लँडिंग केलं. या अभियानाच्या चमूचं इस्त्रोचे अध्यक्ष सोमनाथ यांनी समाज माध्यमा वर पोस्ट लिहून अभिनंदन केलं आहे.

इस्त्रोच्या आजच्या यशस्वी मोहिमेने उपग्रह संचालन, नियंत्रण प्रणाली, लँडिंग गियर आणि डिलेरेशन प्रणाली यांसारख्या क्षेत्रात देशांतर्गत विकसित तंत्रज्ञानाची गुणवत्ता पुन्हा एकदा सिद्ध झाली आहे. ‘पुष्पक’चं स्वयंचलित यशस्वी लँडिंग करून आणखी एक उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल इस्त्रोच्या वैज्ञानिकांचं माहिती आणि प्रसारण मंत्री अनुराग सिंह ठाकूर यांनी अभिनंदन केलं आहे.

<><><><><>

दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी सक्तवसुली संचालनालयाच्या समन्स ला आव्हान देणारी याचिका मागे घेतली आहे. दिल्ली उच्च न्यायालयाने केजरीवाल यांना अटकेपासून संरक्षण नाकारल्यानंतर सक्तवसुली संचालनालयाने काल त्यांना अटक केली. आज त्यांना राऊज अव्हेन्यू न्यायालयात हजर केलं असून सुनावणी सुरु आहे. आम आदमी पार्टीचे सौरव भारद्वाज आणि मंत्री अतिशी यांनाही पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे.

केजरीवाल यांच्या अटकेच्या निषेधात आम आदमी पार्टीने आज दिल्लीसह देशभरात विविध ठिकाणी निदर्शनं केली. नाशिक आणि धुळे जिल्ह्यात अनेक ठिकाणी रास्ता रोको आंदोलन झालं.

<><><><><>

यापुढं आपण कोणतीही निवडणूक लढवणार नसल्याचा पुनरुच्चार ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी केला आहे. बारामतीमध्ये आज ते पत्रकारांशी बोलत होते.

महाविकास आघाडीतल्या जागा वाटपावर चर्चा सुरू आहे, असंही त्यांनी सांगितलं. दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्यावरच्या अटकेच्या करावाईवर पवार यांनी टीका केली.

<><><><><><>

लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर बँक खाती गोठवण्यात आल्याबद्दल दाद मागणारी काँग्रेसची याचिका दिल्ली उच्च न्यायालयानं फेटाळली आहे.

काँग्रेसनं काल लोकसभेसाठी ५७ उमेदवारांची यादी जाहीर केली. त्यात राज्यातल्या सात उमेदवारांचा समावेश आहे. पुणे लोकसभा मतदारसंघातून रविंद्र धंगेकर, लातूरमध्ये शिवाजीराव काळगे, सोलापूरमध्ये प्रणिती शिंदे, कोल्हापूरमध्ये छत्रपती शाहू महाराज, नंदूरबारमध्ये गोवल पाडवी, अमरावतीमध्ये बळवंत वानखेडे, तर नांदेड लोकसभा मतदारसंघातून वसंतराव चव्हाण यांना उमेदवारी देण्यात आली आहे. अकोला पश्चिम विधानसभा मतदारसंघातल्या पोटनिवडणुकीसाठी काँग्रेसनं साजिद खान पठाण यांना उमेदवारी दिली आहे.

दरम्यान प्रदेश काँग्रेसचे सचिव नितीन कोडवते यांनी आज आपल्या समर्थकांसह काँग्रेसच्या प्राथमिक सदस्यत्त्वाचा राजीनामा दिला. ते भाजपामध्ये प्रवेश करतील, असा अंदाज वर्तवला जात आहे.

<><><><><><>

मुंबईतले ऑस्ट्रेलियाचे नवनियुक्त राजदूत पॉल मर्फी यांनी काल मुंबईत राजभवनात राज्यपाल रमेश बैस यांची भेट घेतली. व्यवसाय आणि व्यापारातलं सहकार्य वाढवण्याबरोबरच महाराष्ट्र आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातल्या उच्च शिक्षण कौशल्य विकास, दृक् -श्राव्य निर्मिती उद्योग, कला आणि संस्कृती अशा क्षेत्रांमध्ये सहकार्य वाढवण्यासाठी आपण प्रयत्न करू, असं मर्फी यांनी यावेळी सांगितलं.

आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र दुपारी ३.०० वाजता

२२ मार्च २०२४ - शुक्रवार

<><><><><>

आज जागतिक जल दिन आहे. पाण्याच्या बचतीबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी संयुक्त राष्ट्रांनी १९९२ मधल्या अधिवेशनात २२ मार्च हा दिवस जागतिक जल दिन म्हणून घोषित केला. “शांततेसाठी पाणी” ही यंदाच्या जल दिनाची मध्यवर्ती संकल्पना आहे.

<><><><><>

७० वी वरिष्ठ गट राष्ट्रीय कबड्डी स्पर्धा अहमदनगर इथं काल सुरु झाली. महाराष्ट्रासह, गतविजेते भारतीय रेल्वे, गोवा, हरियाणा या संघांनी विजयी सलामी दिली. स्पर्धेचं उद्घाटन सलग दोन आशियाई कबड्डी स्पर्धा विजेता अर्जुन पुरस्कार प्राप्त अशोक शिंदे यांच्या हस्ते झालं. ब गटात यजमान महाराष्ट्रानं गुजरातला ४८-३१ असं पराभूत केलं. क गटात गोव्यानं बंगालचा ४६-१६ असा पराभव केला तर ड गटात हरियाणानं उत्तराखंडला ४२-२२ असं पराभूत केलं.

<><><><><>

चेन्नईच्या एम. ए चिदंबरम स्टेडियमवर आजपासून इंडियन प्रीमियर लीग क्रिकेट सामने सुरु होत आहेत. गतविजेत्या चेन्नई सुपर किंग्ज आणि रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरू यांच्यात या हंगामाचा सलामीचा सामना होईल. रात्री ८ वाजता सामना सुरु होईल. महेंद्रसिंग धोनी आणि विराट कोहली एकमेकांविरुद्ध खेळणार असल्यामुळे आजचा सामना बघण्यासाठी क्रिकेट प्रेमी उत्सुक आहेत.

<><><><><>

अकोल्यातले डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ आणि स्वित्झर्लंड मधली फिबल येथील सेंद्रिय शेती संशोधन संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने "सेंद्रिय कापूस - भविष्यातील वाटचाल" या महत्वपूर्ण विषयावर एक दिवसीय राष्ट्रीय कार्यशाळेचं

उद्घाटन आज विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. शरद गडाख यांच्या हस्ते झालं. शेती शाश्वत होण्यासाठी शैक्षणिक, संशोधनात्मक आणि विस्तार कार्य करणाऱ्या संस्थांच्या बरोबरीनेच प्रशासकीय विभागांच्या एकात्मिक प्रयत्नांची गरज आहे. सेंद्रिय कापूस लागवडीच्या तंत्रज्ञानाचा प्रसार होण्यासाठी शास्त्रज्ञानी प्रयत्न करावेत असं ते यावेळी म्हणाले. तर विदर्भाच्या जमिनीचा, हवामानाचा आणि पीक पद्धतीचा विचार करता कपाशीसारख्या नगदी पिकाचं खूप महत्त्व आहे असं मत भारतीय कृषी अनुसंधान परिषदेच्या केंद्रीय कापूस संशोधन संस्था, नागपूरचे संचालक डॉ. वाय जी प्रसाद यांनी व्यक्त केलं.

//<><><><><><>//